# खराडे ॲग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: सात || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ ऑगस्ट २०२४

## कृषी क्षेत्राचे भाग्य बदलणारा अर्थसंकल्प?




### कृषी जगतातील विशेष घडामोडी

- मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार जे शेतकरी 7.5 एचपी म्हणजे अश्वशक्तीपर्यंत कृषी पंप वापरतात त्या शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. राज्यात असे कृषीपंप वापरणारे 44 लाख 3 हजार शेतकरी असल्याचे जीआरमध्ये म्हटले आ
- देशांतर्गत पुरवठा वाढविण्यासाठी 20 जुलै 2023 पासून गैर-बासमती पांढऱ्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. मात्र काही देशांना त्यांच्या अन्न सुरक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी विशेष विनंतीनुसार निर्यात करण्यास मान्यता आहे. यादरम्यान केंद्र सरकारने नामिबिया या देशाला 1000 टन बिगर-बासमती पांढरा तांदूळ निर्यात करण्यास मान्यता दिली.

अर्थसंकल्पमध्ये सरकारने 9 क्षेत्रांना प्राथमिकता दिलीय. यात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, ऊर्जा संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पिढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे .केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी नुकत्याच घोषित केलेल्या अर्थसंकल्पणात शेतकऱ्यांसाठी लक्षणीय बाबी ठरविल्या आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे त्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. अर्थमंत्र्यांनी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यावर तसेच पिकांच उत्पादन वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे हा निर्णय कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. पुढच्या दोन वर्षात 1 कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी मदत केली जाईल त्याचबरोबर 10 हजार बायो इनपुट सेंटर बनवले जातील प्रमाणपत्र आणि ब्रँडिंगसह कृषी विकासाला तंत्रज्ञानाची जोड देत नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन दिले जाईल.



|| पुढील पानावर ||

- गीर गायी; जाती-प्रजाती
- यशोगाथा
- बोल अनुभवाचे

# गीर गाय; सर्वोत्तम दूध उत्पादन करणारी भारतीय गाय



जसकी तुम्हाला माहित आहे, देशी गायीच्या अनेक जाती आहेत त्यातीलच एक म्हणजे गीर गायी.

सर्वोत्तम दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध असणारी गीर गाय ही भारतातील गुजरातमधील गीर वन प्रदेशातून उगम पावलेल्या दुग्धजन्य गुरांची एक सुप्रसिद्ध जात आहे. ते मुख्य झेबू जातीपैकी एक आहेत. गीर गाय ही एक बहुमुखी आणि मौल्यवान जात आहे जी त्यांच्या दूध उत्पादन, अनुकूलता आणि लवचिकतेसाठी ओळखली जाते. हया गायी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही प्रकारच्या दुग्धोद्योगांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात आणि त्यांच्या अद्वितीय वैशिष्ट्यांसाठी आणि शाश्वत शेती पद्धतींमध्ये योगदान दिल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली जाते.



गीर गाईचे स्वरूप म्हणजे त्यांचा आकार मध्यम ते मोठा असतो रंगाने तांबडी,पांढरी त्यावर तांबडे टीपके, कधीकधी शुद्ध पांढरा रंग असतो. लांब, वक्र शिंगे जी बाहेरून वाढतात आणि नंतर आतील बाजूस वळतात. लांब, लटकलेले कान ,झेबू जातीचे वैशिष्ट्यपूर्ण कुबड अश्या वर्णनाने ही गाय ओळखली जाते. मूळता त्यांचा स्वभाव सामान्यतः नम्र आणि मैत्रीपूर्ण असतो त्यांचा हा स्वभावामुळे व्यवस्थापन करणे सोपे जाते. त्यांच्या दीर्घ आयुर्मानासाठी आणि अनेक वर्षांपासून कायम उत्पादनक्षमतेसाठीही या ओळखल्या जातात.

यांची अनुकूलता म्हणजे कोरड्या प्रदेशापासून उष्णकटिबंधीय भागापर्यंत विविध वातावरणात तग धरुन राहणे. हया गायी सघन आणि व्यापक अशा दोन्ही प्रकारच्या शेती पद्धतींशी चांगले जुळवून घेतात दुष्काळी परिस्थितीत कमीत कमी संसाधनांवर जगण्याची क्षमतेची प्रतिकारशक्ती यांच्यात असते आनुवांशिकतेच्या योगदानात जागतिक स्तरावर इतर गुरांच्या जातींच्या दुग्धशाळेची वैशिष्ट्ये सुधारण्यासाठी संकरित प्रजनन कार्यक्रमांमध्ये गिर आनुवंशिकता वापरली गेली आहे.

डेअरी उद्योगात गीर गायींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांचे उच्च दूध उत्पादन आणि गुणवत्ता त्यांना व्यावसायिक दुग्ध व्यवसायासाठी मौल्यवान बनवतात. यांच्या दुधाच्या दर्ज्यात बटरफॅटचे प्रमाण जास्त असल्याने त्यांचे दूध ,तूप, लोणी आणि इतर दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनासाठी या गायी आदर्श ठरतात . यांचे दूध उत्पादन दररोज 12 ते 15 लिटर असते तसेच दुधात बटरफॅटचे प्रमाण 4.5% ते 5% असते, जे दुग्धजन्य पदार्थांसाठी उत्कृष्ट बनते. गमतीदार बाब म्हणजे त्यांच्याकडे एक विशिष्ट, मधुर मूइंग आवाज आहे, जे बहुतेकदा शेतकऱ्यांना सुखदायक वाटते गीर गायी ब्राझीलसह इतर देशांमध्ये निर्यात केल्या गेल्या आहेत, जिथे त्यांचा स्थानिक डेअरी उद्योगावर लक्षणीय परिणाम झाला आहे.

# जातिवंत दुधाळ म्हशींसाठी सोलापूरच्या बाजाराला पसंती



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने दर मंगळवारी भरवण्यात येणाऱ्या जनावरांच्या आठवडी बाजारात बैल, गाय, म्हशीसह शेळी, मेंढी आदी सुमारे ५०० ते ८०० हून अधिक जनावरांची आवक होते. सोलापूरचा जनावर बाजार खास म्हशींसाठी ओळखला जात आहे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक अशा तीन राज्यांच्या सीमेवर वसलेल्या सोलापूर जिल्ह्याला बाजारपेठेच्यादृष्टीने वेगळे महत्त्व आहे. उत्तर आणि दक्षिण भारताला जोडणारे केंद्र म्हणूनही सोलापूरकडे पाहिले जाते. एसटी, रेल्वेसारख्या सुलभ सुविधा या ठिकाणाहून आहेत. साहजिकच, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला त्यामुळेच महत्त्वाचे स्थान मिळते आहे. सोलापूर बाजार समितीची स्थापना १९५९ मध्ये तत्कालीन मुंबई सरकारने केली. प्रत्यक्षात १९६१ मध्ये बाजार समिती सुरू झाली. १९६७ नंतर महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री नियमानुसार बाजार समितीचे कामकाज सुरू झाले. पुढे ग्रामदैवत सिद्धेश्वरांच्या नावाने श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती या नावाने बाजार समिती ओळखली जाऊ लागली

**कांद्यासाठी राज्यात लौकिक**

सोलापूर बाजार समितीचे काक्षेत्र सोलापूरनजीकच्या उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यापुरते आहे. उत्तर सोलापुरातील ४१ आणि दक्षिण सोलापुरातील ९० अशी १३१ गावे कार्यक्षेत्रात आहेत. असे असले तरी, उघड लिलाव, रोख व्यवहार आणि दळण-वळणाच्या सुविधांमुळे आजघडीला राज्यातील पहिल्या पाच बाजार समितीमध्ये सोलापूर बाजार समितीचे नाव घेतले जाते. सोलापूर बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील उत्तर सोलापूर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६८ हजार ३०३ हेक्टर आणि दक्षिण सोलापूर तालुक्याचे १ लाख १९ हजार ४६३ हेक्टर असे एकूण १ लाख ८७ हजार ७६६ हेक्टर इतके आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात खरीप हंगामात जिरायती क्षेत्रात प्रामुख्याने बाजरी, तूर, मका आणि रब्बी हंगामात प्रामुख्याने ज्वारी, गहू, हरभरा, करडई इत्यादी पिके घेतली जातात. पण सर्वाधिक व्यवहार कांद्याचे होतात, सोलापूरच्या स्थानिक भागातून कांदा या बाजारात येतो. पुणे, नगर, धाराशिव, बीड, लातूर, सांगली या भागांतील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कांद्यासाठी सोलापूरच्या बाजाराला पसंती दिली जाते

**जातिवंत म्हशी, शेळ्यांसाठी ओळख**

सोलापूर बाजार समितीत खात्रीशीर आणि विश्वासपूर्वक जनावरांची खरेदी-विक्री होते. त्यामुळेच जिल्ह्यासह शेजारच्या धाराशिव, नगर, सातारा, पुणे, सांगली या भागांतून मोठ्या प्रमाणात जनावरे बाजारात येतात. त्यातही सर्वाधिक म्हशी आणि शेळ्या-मेंढ्यांना शेतकऱ्यांची पसंती मिळते. बाजारादिवशी किमान ५०० ते ८०० हून अधिक जनावरे बाजारात येतात. सकाळी नऊ वाजल्यापासून बाजार भरण्यास सुरुवात होते, दुपारी एक वाजेपर्यंत हे व्यवहार चालतात.

# गोवऱ्या, धूप, हवन टिक्की उत्पादनातून अर्थकारण केले बळकट



गीता शिरीष चौधरी

खिरोदा प्रगण यावल, ता. रावेर, जि. जळगाव येथील गीता शिरीष चौधरी यांनी शेतात लहान युनिटमध्ये देशी गाईंच्या शेणापासून गोवऱ्या, धूप, हवन टिक्की आदी निर्मितीचा लघू प्रक्रिया उद्योग सुरू केला आहे.

गीता चौधरी या उच्चशिक्षित. आई-वडील शिक्षक असल्याने माहेरी शेतीचा कधी संबंध आला नाही. मात्र सासरी शेतीचा मोठा व्याप होता. पती शिरीष हे फैजपुरातील एका महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. तर गीता या खिरोद्यातील सप्तपूट ललित कला भवन येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. तेथेच त्या प्राचार्य म्हणून सेवानिवृत्त झाल्या. पती-पत्नी दोघेही उच्चशिक्षित असूनही निवृत्तीनंतर त्यांनी शहराची वाट धरली नाही. गावातच वास्तव्य केले.

गीताताईंना शेती, दुधाळ पशुधनाचे संगोपन यात स्वारस्य होते. सासरी शेती आणि सुरुवातीपासून गोसंगोपन केले जात होते. नोकरी सांभाळून त्या पशुधन व शेतीकडे लक्ष द्यायच्या. पती शिरीष यांची साथ होतीच. याशिवाय त्यांना गावच्या सरपंचपदाची जबाबदारीही पार पाडली. याच काळात गावात डबघाईस गेलेली सहकारी दूध संस्था जिवंत करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. याची धुरा मुख्यतः महिलांकडेच द्यायची, असे निश्चित झाले. गीताताई यांनी सहकारी दूध संस्थेबाबत पुढाकार घेत कामधेनू सहकारी दूध उत्पादक सोसायटीची स्थापना केली. या दूध सोसायटीत एकही पुरुष सभासद, संचालक तसेच पदाधिकारी नाही. सर्व संचालक व पदाधिकारी या महिलाच आहेत. शिवाय दूध पुरवठादारही महिलाच आहेत. या सोसायटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी अजूनही गीताताई सांभाळत आहेत.

जळगाव जिल्हा सहकारी दूध संघात राष्ट्रीय डेअरी विकास मंडळाच्या (एनडीडीबी) कार्यकाळात १५ वर्षे प्रशासकीय समिती सदस्य म्हणून काम पाहिले होते. दूध उत्पादनातील बारकावे, गरजा, नावीन्य, संधी यांची चांगली जाणही गीताताईंना आहे. यातून दूध व्यवसायाचा व्याप वाढवत त्यात त्यांनी वर्षागणिक सुधारणा आणि बदल केले.

## || बोल अनुभवाचे ||

### श्री. शिवाजी बोडके

खराडे ॲग्रोच्या फ्रूटनेटच्या वापरामुळे लोकल नेटपेक्षा त्याची गुणवत्ता किती उत्तम आहे हे मी अनुभवले. या नेटमुळे पिकांना पावसाच्या थेंबांपासून संरक्षण मिळाले आणि पक्ष्यांच्या तसेच इतर कीटकांच्या हल्ल्यापासूनही फळांची रक्षा होत आहे. खराडे ॲग्रोचे फ्रूटनेट हे फक्त पिकांचं संरक्षण करत नाही तर शेतीच्या उत्पन्नावर देखील वाढ करण्यास मदत होत आहे. माझ्या या अनुभवावरून स्पष्ट होतं की, खराडे ॲग्रोचे फ्रूटनेट हे शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून एक फायद्याचे साधन ठरू शकतं.

### श्री. सौरभ कदम

खराडे ॲग्रोच्या फ्रूट नेटमुळे माझ्या पेरूफळांची गुणवत्ता खूपच सुधारली आहे. फळे आकाराने मोठी आणि चमकदार झाली आहेत. या फ्रूट नेटमुळे माझ्या पिकांचे संरक्षण झाले, उत्पादन वाढले आणि फळांची गुणवत्ता सुधारली. यामुळे माझ्या शेतीचे उत्पादन वाढले आहे आणि मी चांगला नफा मिळवू शकलो आहे. याशिवाय, ही फ्रूटनेट वापरण्यासाठी सोपी आहेत आणि टिकाऊ आहेत. मी इतर शेतकऱ्यांनाही या बॅग्स वापरण्याचा सल्ला देईन.

पान नं. 1 वरुन
( कृषी क्षेत्राचे भाग्य बदलणारा अर्थसंकल्प? )

डाळी आणि तेलबिया क्षेत्रात शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनण्यावर लक्ष असेल. सप्लाय चेन उत्तम बनवण्यासाठी क्लस्टर बनवले जातील ज्यामुळे अडथळ्यांच्या शर्यतीत शेतकरी मित्रांचा विजय होईल अशी आशा आहे

मुद्रा योजनेअंतर्गत 20 लाख रुपयांपर्यंत कर्ज अन्नदात्यांना देण्यात येणार आहे. याशिवाय सार्वजनिक आधारावर आधारित किसान क्रेडिट कार्ड पाच राज्यांमध्ये जारी केले जातील.

प्राथमिक सहकारी संस्थांचा उपयोग करून बांधाजवळील गोदामीकरण व्यवस्थेला चालना देऊन गोदामसाखळीचे विकेंद्रीकरण केले जाणार आहे. ग्रामीण भागात धान्य आणि इतर शेतीमाल साठवण्याच्या सुविधा उपलब्ध होऊन त्यातून शेतकरी उत्पन्नात वाढ साधता येईल. फायदेशीर शेतीसाठी, शेतीचा खर्च कमी करून उत्पादन वाढवण्यावर आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात सर्वसमावेशक सुधारणा करण्यावर सरकारचा भर असणार आहे.